# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयकुत्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. ४४६ /२०२३ दिनांक २९/१२/२०२३

## “नवीन वर्षाच्या पुर्वसंध्येला अंमली पदार्थ खरेदी विक्री करण्याचा परकिय नागरीकांचा हेतु “अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडून उध्वस्त.”

नवीन वर्षाच्या स्वागतार्थ मिरा-भाईदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये आयोजित कार्यक्रमा मध्ये अंमली पदार्थाचा वापर होण्याची दाट शक्यता असुन आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थाची खरेदी विक्री करीत असणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याचे आदेश मा. वरिष्ठांनी दिले होते.

त्या अनुषंगाने दि.२९.१२.२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक.अमर मराठे, पो.हवा. प्रदिप टक्के, महेश पागधरे सुनिल कुडवे, अजय सपकाळ, सुभाष आव्हाड, पो.अं. अजय यादव असे पोलीस पथक रवाना झाले होते.

गस्ती दरम्यान वसई, आचोळे, नालासोपारा (पुर्व), तुळींज, मोरेगांव, प्रगतीनगर, ९० फुट रोड, हायटेन्शन रोड परिसरात शासकीय वाहन क्र. एम.एच.३३-सी-०३७५ मधुन गस्त करीत असताना नालासोपारा (पुर्व), प्रगतीनगर मध्ये हायटेन्शन रोडवरुन बसेरा बिल्डींग बाजुकडे येत असताना शिवकृपा बिल्डींग समोर दोन दक्षिण आफ्रिकी वंशाचे ईसम हे एकमेकांशी बोलत असुन एकाच्या पाठीवर सॅक बॅग व दुसऱ्याच्या खांदयावर क्रॉस मध्ये लहान सॅक अडकवलेली असताना मिळुन आले त्यांचे हालचाली संशयास्पद वाटत असल्याने त्याचेकडे कोणतातरी अंमली पदार्थ असल्याची शक्यता निर्माण झाल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले. नमुद नायजेरीयन वंशाच्या दोन्ही इसमाना ताब्यात घेवुन त्यांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांचे कब्ज्यात **५५४.४ ग्रॅम वजनाचा १,१०,८८,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन(एम.डी) व १२०.४ ग्रॅम वजनाचा ३६,१२,०००/-रु. किंमतीचा कोकेन असा एकुण १,४७,००,०००/- रुपये किंमतीचा अंमली पदार्थ व्यावसायीक प्रमाणात विक्री करीता जवळ बाळगला असताना मिळुन आले** असुन सदर अंमली पदार्थ अंगझडती पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला आहे. नमुद ईसमाविरुध्द एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क), २१(क),२२ (क),२९ प्रमाणे तुळींज पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ९०७/२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास तुळींज पोलीस ठाणे मार्फत चालु आहे.

सदरची कारवाई मा.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोनि.अमर मराठे, पो.हवा. प्रदिप टक्के, महेश पागधरे सुनिल कुडवे, अजय सपकाळ, सुभाष आव्हाड, पो.अं. अजय यादव यांनी केली आहे.